Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 559 – 565

DOI: 10.5281/zenodo.10258804

Original Research Article

# महात्मा गांधींचे आर्थिक आणि सामाजिक विचार

प्रा. डॉ. पवार एस. व्ही.

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर ४१३५३२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sudampawar1976@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 27 October, 2023 | Published: 28 October, 2023

**प्रस्तावना**

आपल्या भारत मातेला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या व्यक्तीमध्ये ज्यांचे नाव अतिशय गौरवाने घेतले जाते,ते नाव म्हणजे "मोहनदास करमचंद गांधी" ज्यांना आपला देशच नव्हे तर संपूर्ण विश्व 'महात्मा' 'राष्ट्रपिता' अशा संबोधनांनी ओळखतो. महात्मा गांधींच्या जीवन चरित्राचा वेगळा परिचय करून देण्याची गरज नाही. कारण त्यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदानच सर्वश्रुत असून सत्य, अहिंसा आणि स्वावलंबन यातून त्यांनी सर्व भारतीयांना देशभक्तीचे मूर्तिमंत उदाहरण दाखवून दिले. आणि याच सत्याच्या मार्गाचा अवलंब करून भारताला पारतंत्र्यातून मुक्त करून स्वातंत्र्य प्राप्त करून दिले.

आपल्या भारत देशामध्ये आधुनिक आर्थिक विचारांची सुरुवात 19 व्या शतकापासून झालेली दिसून येते. 19 व्या शतकामध्ये ब्रिटिशांचे आगमन भारतामध्ये झाली होते .ब्रिटिशांनी भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक लूट करण्याचे धोरण राबविले होते. भारतीयांवर प्रचंड अन्याय होत होता, तसेच शोषण होत होते, या जुलमी शोषण करणाऱ्या ब्रिटिशाविरुद्ध ज्या भारतीयांच्या प्रतिक्रिया होत्या त्या प्रतिक्रिया म्हणजे आधुनिक काळातील भारतीय अर्थशास्त्रीय विचार होते. यात प्रामुख्याने दादाभाई नौरोजी, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, महादेव रानडे, गोपाळकृष्ण गोखले, इत्यादींचे नाव घेता येतील. याच भारतीय आधुनिक आर्थिक विचारवंतातील प्रमुख नाव म्हणजेच महात्मा गांधी होय. महात्मा गांधी यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये सत्य, अहिंसा आणि स्वावलंबन या त्रिसुत्रीच्य विचारावरुन इंग्रजांना शह दिला.

भारताच्या आर्थिक विचारांमध्ये किंवा आर्थिक विचारवंतांमध्ये महात्मा गांधींचे स्थान कोणते? हा जेव्हां प्रश्न पडतो तेव्हा गांधीजी एका अर्थाने अर्थशास्त्रज्ञ नव्हते, किंवा त्यांनी अर्थशास्त्राच्या बाबत स्वतंत्र ग्रंथही लिहिला नाही. महात्मा गांधींनी धर्म, राजकारण, समाजकारण, देशभक्ती किंवा एकूणच जीवनाचे जे तत्त्वज्ञान मांडले त्यातच त्यांचे प्रमुख आर्थिक विचार विखुरलेले दिसून येतात. त्या विखुरलेल्या आर्थिक विचारांना एकत्रित करण्याचे काम त्यांच्या अनेक अनुयायानी केले. महात्मा गांधींच्या दृष्टीने अर्थशास्त्र हे वेगळी नसून जीवनाच्या क्रमाचा व तत्त्वज्ञानाचाच एक भाग आहे. अर्थशास्त्र आणि नितीशास्त्र यांची फारकत करणे त्यांना मान्य नव्हते. किंवा त्यांच्यामते नैतिक जीवनाचा प्रभाव मानवाच्या आर्थिक जीवनावर असायला हवा. पाश्चात्यांच्या प्रणालीतील भौतिक वादाचा अतिरेक अयोग्य असून महात्मा गांधीजींच्या दृष्टीने व्यवहारिक शास्त्राला नैतिक मूल्याची जोड दिल्याशिवाय व्यक्तीचे व राष्ट्राचे कल्याण होऊ शकत नाही. म्हणजेच भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधींनी जे विचार व्यक्त केले, जे लेखन केले, तेच त्यांचे आर्थिक विचार आहेत. त्यांच्या विचाराला राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक आशय आहे. महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांचे अध्ययन करण्यासाठी महात्मा गांधींनी मांडलेल्या अनेक संकल्पनेपैकी कांही महत्त्वाच्या आर्थिक संकल्पनांचा, आढावा घेऊन त्यांच्या आर्थिक विचारांचा मागवा प्रस्तुत संशोधन लेखातून घेण्यात आलेला आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टे**

१. महात्मा गांधींच्या आर्थिक संकल्पनेतील ग्रामस्वराज्य या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. विश्वस्त संकल्पनेचा आढावा घेणे.

३. औद्योगीकरण व विकेंद्रीकरण इत्यादी बाबतचा अभ्यास करणे.

४. स्वदेशी, स्वावलंबन या आर्थिक विचारांचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहीतके**

१. महात्मा गांधींच्या आर्थिक संकल्पनेतील ग्रामस्वराज्य विश्वस्त या संकल्पनेमुळे भारताच्या ग्रामीण विकासात भर पडण्यात मदत झाली आहे.

२. यंत्रे, औद्योगीकरण, विकेंद्रीकरण तसेच स्वदेशी व स्वावलंबन या संकल्पनेमुळे आर्थिक विकासाबरोबरच स्वयंपूर्ण खेडी बनण्यास सद्यस्थितीतही हे विचार उपयोगी आहेत.

**महात्मा गांधींचे प्रमुख आर्थिक विचार**

महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी मांडलेल्या अनेक प्रकारच्या संकल्पना विचारात घेण्यात आलेल्या आहेत. त्यांनी मांडलेल्या अनेक संकल्पनेपैकी काही महत्त्वाच्या आर्थिक संकल्पनांच्या माध्यमातून आपण त्यांच्या आर्थिक विचारांचा मागोवा पुढीलप्रमाणे घेण्यात येणार आहे.

**१. ग्राम स्वराज्य**

भारत हा खेड्यांचा देश आहे. आणि एकूणच भारत देशाचा विकास करायचा असेल त अगोदर खेड्यांचा विकास झाला पाहिजे. भारतातील खेडे समृद्ध झाले तर भारत देश आपोआपसमृद्ध होतो असे त्यांचे मत होते. भारतातील ग्रामीण

भागाचा अर्थातच खेड्यांचे पुनर्रज्जीवन झाले पाहिजे असे महात्मा गांधींचे स्वप्न होते. प्राचीन काळामध्ये भारतीय भारतीय खेडे ही स्वयंपूर्ण व स्वावलंबी होती. उत्पादन विभाजन व उपभोग या तिन्ही आर्थिक क्रिया खेड्यांच्या पातळीवर एकाच वेळी घडत होत्या. एक खेडं दुसऱ्या खेड्यावर अवलंबून नव्हते. पण आधुनिक काळात हे चित्र बदलून गेले आणि खेड्यांची स्वयंपूर्णता लयास गेली. कच्चामाल भारताच्या ग्रामीण भागातील खेड्यात तयार व्हायला लागला पण पक्कामाला मात्र शहरात तयार व्हायला लागला व जास्त किमतीचा पक्का माल खरेदी करण्याची वेळ खेड्यातील लोकांवर आली. खेड्यातील सामान्य जनतेची यामुळे आर्थिक लूट होऊ लागली. कारण अधिक किमती आकारून खेड्यातील पैसा, संपत्ती शहराकडे जाऊ लागली. यातून खेड्यांचे शोषण होऊन ग्रामीण खेड्यातील लोकांचे आर्थिक उत्पन्न कमी झाले. त्याचा परिणाम म्हणून खेडी पातळीवरील जनता बेकारी, दारिद्र्य, उपासमार या दुष्टचक्राच्या विळख्यात सापडली. वरील प्रकारच्या दुष्टचक्राच्या समस्येपासून खेड्यातील जनतेची सोडवणूक करायची असेल, तर भारतातील खेड्यांचे पुनर्रज्जीवन झाले पाहिजे. असा विश्वास महात्मा गांधी यांनी व्यक्त केला. भारतातील खेडी स्वयंपूर्ण व स्वावलंबी बनली पाहिजेत. तरच भारताचा कायापालट होऊ शकेल अन्यथा नाही. ग्रामस्वराज्य व स्वयंपूर्ण खेडी या संकल्पनेत महात्मा गांधीना पुढीलबाबी अपेक्षित होत्या. त्यात नीटनेटकी ग्रामरचना, शाळा, धर्मशाळा, दवाखाना, प्रार्थनास्थळे, सार्वजनिक नाट्यगृह, करमणूकीच्या सोयी, सार्वजनिक हॉल, खेळांचे मैदान, जनावरांची राखीव व्यवस्था, मूलभूत शिक्षण हे सर्व उपक्रम सरकारी पद्धतीने राबवावीत. पंचायत लोकशाही पद्धतीने खेड्यांचे शासन चालावे स्वच्छता, नालासफाई, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दिवाबत्ती, खेड्यांचे रक्षण हे त्या - त्या खेड्यांनीच करावेत फळांची झाडे असावीत, अन्न, वस्त्र, निवारा याबाबतीत न्यायदान असावे. जातीप्रथा नसावी, व्यवहार सहकार्य तत्त्वाने व्हावा अहिंसापूर्ण सत्याग्रह व असहकार हे एकमेव जनतेचे अस्त्र असावे. या सर्व सुविधा पुरवून खेड्यांचे पुनर्रज्जीवन करायचे असेल तर शिक्षण, आहार व दारिद्र्य यासंबंधीचे प्रश्न व समस्या अगोदरच खेड्यांनी सोडवाव्या लागतील. अशा पद्धतीने ग्रामस्वराज्य बाबतचे मौलिक आर्थिक विचार महात्मा गांधीजींनी मांडलेले आहेत. आजही ग्रामस्वराज्य बाबतचे विचार 21व्या संगणकाच्या शतकातही तितकेच गरजेचे आहेत या विचारांच्या अंमलबजावणी शिवाय आजही देशाचा सर्वांगीण विकास होणे शक्य नाही, म्हणून महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्य या संकल्पनेला आजही अनन्य साधारण महत्त्व आहे.

**२. विश्वस्त संकल्पना**

महात्मा गांधीजींनी ज्या उदात्त तत्वांचा पुरस्कार केला. त्यात सत्य, अहिंसा या तत्त्वाबरोबरच अपरिग्रहाला स्थान दिलेले आहे. अपरिग्रह म्हणजे संग्रह न करण्याची वृत्ती किंवा सवय होय. त्यांच्या आदर्श समाजात ही वृत्ती गृहीत असल्यामुळे उत्पन्न आणि संपत्तीच्या विषमतेला वाव नाही वाव नाही. परंतु ही अवस्था साध्य होईपर्यंत समाजातील श्रीमंत लोकांनी स्वतःला त्या संपत्तीचे मालक न समजता विश्वस्त समजावे, अशी महात्मा गांधीजींनी अपेक्षा होती. महात्मा गांधीजींच्या शब्दात, "श्रीमंत मनुष्याकडे त्याची संपत्ती तशीच राहील, पण त्याच्या वाजवी वैयक्तिक गरजांसाठी जेवढा भाग आवश्यक असेल तेवढाच तो वापरेल. उर्वरित संपत्तीचा तो विश्वस्त असावा, व तो भाग समाजासाठी खर्च व्हावा. "जरी एखाद्या व्यापार किंवा उद्योगाच्या माध्यमातून नफा मिळवला असेल, किंवा त्याला वडिलोपार्जित धन

मिळाले असेल, तरी ती संपूर्ण संपत्ती त्याची नसून समाजाची असते. स्वतःच्या दैनंदिन सामान्य गरजा भागविण्यासाठी त्यातील काही संपत्तीचा भाग वापरण्याचा अधिकार त्याला जरूर आहे. परंतु हे सामान्य जीवन सुद्धा असेच असावे, जे देशातील करोडो लोक जगतात.

परंतु वर्तमान अवस्थेत श्रीमंत किंवा भांडवलदार याप्रमाणे वागत नाहीत. म्हणूनच थोड्या औद्योगिक समूहाचे साम्राज्य निर्माण होते. प्रचंड संपत्ती गोळा करणाऱ्या अशा भांडवलदारांना गांधीजींनी चोर म्हणायचे परंतु या चोरांच्या जवळील संपत्ती जबरदस्तीने हिसकावून घेणे, त्यांच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानात बसत नव्हते. त्याऐवजी अशा श्रीमंत लोकांचे हृदय परिवर्तन आणि ऐच्छिकता यावर त्यांनी भर दिला, कारण श्रीमंत लोकांमध्येही संपत्ती संग्रहित करण्याचे कौशल्य असते, व त्याचा वापर समाजाच्या हितासाठी करून घेतला नाही तर समाजाचे नुकसान ठरेल. वास्तविक श्रीमंतांनाच संपत्ती संग्रहणाची वाईट बाजू कळायला हवी, म्हणजे मग ते त्या संपत्तीचे मालक म्हणून न वागता विश्वस्त म्हणून वागतील. त्या संपत्तीचा वापर समाजाच्या कल्याणाकरिता करतील व विश्वस्ताची कल्पना प्रत्यक्षात येताच वर्ग संघर्षाचा प्रश्न उरणार नाही.

अशा पद्धतीची विश्वस्ताची कल्पना महात्मा गांधींनी मांडून जगासमोर आपल्या स्वतःच्या जगण्यातून आणि आचरणातून आदर्श घालून दिला. त्यातूनच महात्मा गांधींची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ही विचारसरणी कृतीतून अंमलात आणल्याचे दिसून येते. म्हणूनच महात्मा गांधींचे हे विचार अत्यंत प्रभावी आणि आजही महत्त्वाचे आहेत.

**३. औद्योगीकरण व विकेंद्रीकरण**

देशी उद्योगांमध्ये यंत्र उद्योग व ग्रामोद्योग या दोन्हींचाही समावेश होत होता. गांधीजींनी मात्र मोठ्या कारखान्यापेक्षा ग्रामोद्योगांनाच प्राधान्य दिले. यावेळी भारतातील 70% जनता शेतीवर अवलंबून होती. उपजिविकेचे प्रमुख साधन शेती हेच होते. शेतीचा लहान आकार ,मध्ययुगीन उत्पादन तंत्र, पावसाची अनिश्चितता यामुळे उत्पन्न कमी होते. शेती पावसावर आधारित असल्यामुळे हंगाम संपला की काम नसे. बेकारी हे दारिद्र्याचे मुख्य कारण होते .यंत्रामुळे भारताचे दैन्य नाहीसे होणार असेल तर मोठ्या यंत्राचाही मी स्वीकार करेन, अशी गांधीजी म्हणत. यंत्राने मानवाला गुलाम बनवू नये, त्यांने त्याचा मित्र बनावे असे गांधीजींचे मत होते. रोजगाराच्या दृष्टीने भांडवलशाहीदृष्टीत यंत्र उद्योगापेक्षा श्रमाधिष्ठत ग्रामउद्योगांची आपण का सुधारली पाहिजे. त्यासाठी त्यांनी चरख्याचा वापर करून कापूस कातुन कापड ते स्वतः तयार करत असत. सामान्य लोकांच्या कल्याणाचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून बेकारी निवारण्यासाठी अग्रक्रम देण्याचा गांधीजींचा विचार चुकीचा नव्हता. त्याचबरोबर यंत्र आणि रोजगार यासाठी खऱ्या अर्थाने ग्रामोद्योगांचा त्यांनी स्वीकार केला. सामान्य लोकांच्या कल्याणाचे उद्देश डोळयासमोर ठेवून त्यांनी बेकारी निवारणाला अग्रक्रम देण्याचा गांधीजींचा विचार चुकीचा नव्हता, असे कोणालाही मान्य करावे लागेल. तसेच विकेंद्रीकरणाबाबत गांधीजींच्या मते, आर्थिक व्यवस्थेचे विभाजन स्वयंपूर्ण अशा छोट्या- छोट्या घटकांमध्ये करायला

हवे. आर्थिक केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरणातील फरक याबाबतीत गांधीजींच्या मते, केंद्रीकरण हे एक प्रकारे गुलामगिरीला आमंत्रण असून त्यामुळे विविध संकटांची साखळीच निर्माण होते. तर या उलट विकेंद्रीकरणामुळे मानवी गरजा मर्यादित राहून त्या लवकर पूर्ण होतात. म्हणून विकेंद्रीकरण आवश्यक असल्याचे आर्थिक विचार महात्मा गांधींनी मांडलेले आहेत.

**४. स्वदेशी आणि स्वावलंबन**

स्वदेशी हा तर गांधीजींच्या आर्थिक विचारांचा मुख्य आधार आहे. स्वदेशी म्हणजे गांधीजींचे त्या काळातील राजकीय शस्त्र होय. विदेशी मालावर बहिष्कार टाकून स्वदेशी उद्योगाला संरक्षण देणे हा या चळवळीच्या पाठीमागचा गांधीजींचा उद्देश होता. देशातील लोकांना ज्या ज्या वस्तूंची गरज आहे, अशा वस्तू उद्योगातूनच निर्माण केलेल्या असाव्यात तरच देशी उद्योगांचा विकास होऊ शकतो आणि नफ्याच्या रूपाने विदेशात जाणारी संपत्ती आपल्याच देशात राहू शकते आणि राष्ट्र स्वावलंबी बनू शकते असा गांधीजींचा आग्रह होता. आणि त्यासाठी त्यांनी स्वदेशीचा आणि स्वदेशी उद्योगाला चालना मिळावी यासाठी प्रयत्न केले. चरख्यावर स्वतः कापूस विणून खादी कापड तयार केले. आणि चरखा हेच स्वदेशीचे प्रतिबिंब असल्याचे दाखवून दिले. स्वदेशीच्या माध्यमातून देशाची आर्थिक स्थिती सुधारते व राष्ट्र स्वावलंबी बनते असा गांधीजींचा समज होता. आणि तो तत्कालीन कालखंडामध्ये बरोबरही होता.

स्वावलंबनाच्या बाबतीत महात्मा गांधींनी खेड्याकडे चला असा संदेश दिला होता. आजच्याप्रमाणेच त्यावेळी देखील ग्रामीण अर्थव्यवस्था महत्त्वाची होती. मात्र आज देखील देशातील प्रत्येक शहरात वाढत जाणारा रोजगाराचा प्रश्न, वाढती गर्दी, गुन्हेगारी यामुळेच गांधीजींचा खेड्याकडे चला आणि स्वावलंबी जीवन जगा हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक कुटुंब हे स्वावलंबी असली पाहिजे यावर गांधीजींनी अधिक भर दिला. वैयक्तिक आणि कौटुंबिक स्वावलंबूनातूनच खेडी स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी होऊन भारताला आर्थिक विकास साधने शक्य होईल. स्वावलंबनासाठी ग्रामीण जनतेला स्वयंपूर्ण करण्यासाठी गांधीजींनी कुटीर उद्योगाचे महत्त्व पटवून दिले. 'चरखा 'आहे त्याचे उत्तम उदाहरण त्यांनी सर्वांसमोर ठेवले. कमी भांडवलाच्या आणि जास्तीत जास्त रोजगार देणाऱ्या म्हणजेच स्वावलंबी बनवणाऱ्या लहान उद्योगाची स्थापना करून स्वालंबनाचा व ग्रामीण विकासाचा मंत्र गांधीजींनी दिला. प्रत्येकाने आपापली कामे स्वतः करून स्वावलंबी जीवन जगावे यावरही त्यांनी भर दिला.म्हणूनच गांधींजी स्वतः सूत काढायचे व त्यातून खादीचा कपडा तयार करून वापरायचे .हा समलंबनाचा आदर्श खादीच्या माध्यमातून त्यांनी जगाला घालून दिला. त्यांच्या या कार्यावरूनच गांधींजी फक्त बोलके सुधारक नसून तर ते करते सुधारक असल्याचे स्पष्ट होते. म्हणूनच गांधीजींचे आर्थिक व सामाजिक विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. अशाप्रकारे गांधींजींचे ग्रामस्वराज्य, विश्वस्त, औद्योगिकरण व विकेंद्रीकरण, स्वदेशी आणि स्वावलंबन इत्यादी अनेक महत्त्वाचे आर्थिक विचार त्यांनी मांडले

**निष्कर्ष**

१. ग्रामीण भागाच्या विकासाशिवाय देशाचा विकास शक्य नाही हे ग्राम स्वराज्याचे विचारच देशाला स्वयंपूर्ण बनवू शकतात हे त्यांच्या आर्थिक विचारावरुन स्पष्ट होते.

२. आजही भारताच्या सर्वांगीण विकासासाठी विश्वस्त संकल्पना ही अत्यंत महत्त्वाची आहे. याच विचारातून समता प्रस्थापित होण्यास मदत होऊन देशहित साध्य होते हे स्पष्ट होते.
३. औद्योगीकरण आणि विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून उत्पादन आणि वितरण छोट्या -छोट्या क्षेत्रामध्ये विभागून अनेक समस्या व अडचणी दूर होतील व अनेक दोष विकेंद्रीकरणामुळे टाळले जातात हे दिसून येते.
४. महात्मा गांधींनी दिलेला स्वदेशीचा नारा आजच्या जागतिकीकरणात सुद्धा अत्यंत महत्त्वाचा आर्थिक विचार असून याच विचारात आजही राष्ट्रहित असल्याचे दिसून येते.
५. स्वदेशी आणि स्वावलंबनातून देशाच्या साधनसामग्रीचा आणि पर्यायाने स्वतःच्या क्षमतांचा वापर होऊन रोजगार व कुटीर उद्योगात वाढ होऊन राष्ट्रहित साधले जाते हे दिसून येते.
६. सद्यस्थितीही महात्मा गांधींचे विचारच देशाला विकासाच्या मार्गावर नेऊन आर्थिक उन्नतीतून राष्ट्र उभारणी करण्यासाठी आजही अत्यंत महत्त्वाचे आहत.

## सारांश

महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार हे आदर्शवादी आहेत भारतात आजही मोठ्या प्रमाणात लोकसंख्या खेड्यात राहते 21व्या शतकात ही खेड्यांचा म्हणावा असा विकास अजूनही झालेला नाही, आणि त्यासाठी त्यांचे ग्रामस्वराज्य, विश्वस्त या संकल्पना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. तसेच औद्योगीकरण विकेंद्रीकरण स्वदेशी आणि स्वावलंबन या विचारातुनच खऱ्या अर्थाने देशातील विकासाला चालना मिळू शकते. कारण खेडी स्वयंपूर्ण करणे हे गांधींच्या विचाराशिवाय होऊ शकत नाही. म्हणूनच आदर्श खेड्यांची रचना आजही त्यांच्या आर्थिक विचारांमध्ये आहे. तसेच गांधीजींनी सत्य, अहिंसा साधी राहणी -उच्च विचारसरणी, परोपकार, समता ,बंधुता या गुणांचा आणि विचारांचा त्यांनी पुरस्कार केला. म्हणूनच गांधींच्या विचारातील दूरदर्शीपणा आजही तितकाच महत्त्वाचा आहे. सध्या महात्मा गांधींच्या विचार बाबत असे म्हणता येईल की, आजचे जग गांधी विचार स्वीकारण्या इतपत परिपक्व झाले कि नाही? पण शेवटी आजही गांधी विचारांना  पर्याय नाही. आजही महात्मा गांधींचे आर्थिक व सामाजिक आणि इतर सर्व विचारच देशाला तारू शकतात. म्हणूनच गांधींचे आर्थिक आणि सामाजिक विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. हे दिसून येते.

## संदर्भ सूची

१. गांधी अर्थ विचार - कुमार आप्पा जो कॉ
२. आर्थिक विचारांचा इतिहास - विजय कवीमंडन
३. आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास - डॉ. जयसिंग पवार, सौ. वसुधा पवार
४. आधुनिक भारत - कदम य. ना. फडके प्रकाशन, कोल्हापूर
५. आर्थिक विचारांचा इतिहास - डॉ. बी. डी. इंगळे
६. आर्थिक विचारांचा विकास - प्रा.के.एच.ठक्कर
७. महात्मा गांधी विचार संग्रह - रिया प्रकाशन, कोल्हापूर

८. माझे सत्याचे प्रयोग - एम. के. गांधी
९. www.loksatta.co
१०. www.google.com